महाराष्ट्र शासन

## औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

माहितीचा अधिकार

कामगार भवन- ५ वा मजला, ई-ब्लॉक, सी-२०, रिझर्व्ह बँकेच्या समोर, वांद्रे -कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१ दुरध्वनी क्र.२६५७२५०४/०९/२२/५८, फॅक्स नं. २६५७२४७४,
ईमेल: dirdish.mum-mh@gov.in website : www.mahadish.in

---

क्र. संऔसुवआ/सूट/ ५६२८ /१,
दिनांक :- 12 AUG 2021

परिपत्रक क्र. : २२/२०२१.

विषय : **कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत कल्याण अधिकारी म्हणून नाव नोंदणीची प्रक्रिया रद्द करण्यात आल्याबाबत.**

महाराष्ट्र कल्याण अधिकारी (कर्तव्ये, अर्हता व सेवाशर्ती) नियम, १९६६ मधील नियम २ नुसार कारखान्यातील कामगारांच्या विहित संख्येनुसार, कल्याण अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक आहे. कल्याण अधिकारी या पदाकरीता नियुक्ती होणेकरीता, या संचालनालयाकडे पात्र उमेदवारांना नोंदणी करणे आवश्यक होते. शासन अधिसूचना क्रमांक एफएसी-२०१८/प्र.क्र. २६२/कामगार-४, दि. २९ मे, २०१९ अन्वये महाराष्ट्र कल्याण अधिकारी (कर्तव्ये, अर्हता व सेवाशर्ती) नियम, १९६६ मध्ये सुधारणा करण्यात आली असून, कामगार कल्याण अधिकारी पदाकरीता आवश्यक असलेली नोंदणीची प्रक्रिया रद्द करण्यात आलेली आहे. परंतु कल्याण अधिकारी पदासाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हता व इतर निकषामध्ये काहीही बदल करण्यात आलेला नाही.

तरी सर्व कारखाना व्यवस्थापनांना याद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी कामगार कल्याण अधिकारी पदाकरीता पात्र असलेल्या उमेदवारांकडून या संचालनालयामार्फत देण्यात येणाऱ्या नोंदणी प्रमाणपत्राची मागणी करण्यात येऊ नये.

तसेच नोंदणीची प्रक्रिया रद्द करण्यात आली असल्यामुळे, कामगार कल्याण अधिकारी पदाकरीता पात्र असलेल्या सर्व इच्छुकांना कळविण्यात येते की, त्यांनी कल्याण अधिकारी नाव नोंदणीकरीता या संचालनालयास अर्ज सादर करु नये.

(सु.प्र. राठोड)
संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहितीकरीता सादर,

१) सर्व अपर / सह संचालक / उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र राज्य.

२) सर्व नोंदणीकृत कारखाने.

३) शाखा क्र. ८.